ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | नवधारा |
| संपादक | : | गो. म. वाटवे<br>माधव देसाई<br>शान्ताराम रामचन्द्र |
| प्रकाशक | : | उषा प्रकाशन, औन्ध |
| प्रकाशन वर्ष | : | १९४६ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

# नवधारा

(काव्यसंग्रह)

861.6
Wat-Des
5504

प्रथमावृत्ति
मे १९४६
मूल्य
१। रुपया

संपादक
गो. म. वाटवे
माधव देसाई
शान्ताराम रामचन्द्र

# नवधारा

★

सम्पादक

गो. म. वाटवे
माधव देसाई
शान्ताराम रामचन्द्र

★

मुद्रक
तरुण
भारत
बेळगांव

सर्वाधिकार
संपादकाधीन

प्रथमावृत्ति
मे
१९४६

प्रकाशक
श्री. वसंत
सातवळेकर
उषा प्रकाशन
— औन्ध —

मूल्य
१। रुपया

# सम्पादकीय

## " महाराष्ट्र कवि परंपरा । खंड न पडला तिला जरा "

" महाराष्ट्र साहित्य संमेलना "चे निमित्तानें काव्य-संग्रह प्रकाशित करण्याचें आह्मी जेव्हां ठरविलें तेव्हां पुष्कळ अडचणी आमच्यापुढें आल्या. सर्वांत मोठा प्रश्न आर्थिक मदतीचा ! आह्मी आमची काव्यसंग्रहाची कल्पना व आमची अडचण येथील वाङ्मयप्रेमी व दानशूर डॉक्टर गो. वा. हेरेकर यांच्या कानावर घातली. आणि आमच्यासारख्या उत्साही तरुणांना नेहमीं उत्तेजन देणाऱ्या डॉक्टरसाहेबांनीं आह्माला लागेल ती मदत करण्याचें आनंदानें कबूल केलें. कर्ते करविते तेच असल्यामुळें त्यांचे आभार कसे मानायचें ?

आर्थिक प्रश्न सुटला ह्मणून श्वास घ्यावा न घ्यावा तोंच प्रकाशकाचा प्रश्न आह्माला भेडसावूं लागला ! पण थोड्याशा प्रयत्नानें याहि बाबतींत आह्माला यश आले. औंधच्या " उषा प्रकाशन "चें श्री. वसंतराव सातवळेकर, बी. ए यांनीं प्रकाशनाची जबाबदारी घेतली. या मदतीबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेंच !

एवढी तयारी झाल्यावर कार्याला काय उशीर ? आह्मी शक्य तेवढ्या कवि-कवयित्रींना समक्ष भेटून, पत्र घाढून कविता मागविल्या. कवि बेळगांवचा, शक्य तों अप्रसिद्ध, तरूण, नवोदित असावा या गोष्टीकडे आह्मी विशेष लक्ष दिलें. आह्मी विनंति केलेल्या सर्वच कवि–कवयित्रींनीं सौजन्यानें आह्माला उत्तेजन देऊन लिखाण पुरविले त्याबद्दल आह्मी कृतज्ञ आहोंत !

कवितांच्या निवडीमध्यें प्रा. डॉ. ग्रामोपाध्ये, प्रा. वि. म. कुलकर्णी व प्रा. ना. मा. संत यांनीं मदत करून आम्हाला वेळोवेळीं उत्तेजन दिलें. त्यांनीं केलेल्या बहुमोल सूचनांबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

पुस्तकांत एकंदर १८ कवींच्या ५२ कवितांचा समावेश केला आहे. कविता उपनांवांच्या वर्णानुक्रमाप्रमाणें छापल्या आहेत. ४३ ते ५२ या कविता पुस्तकाची छपाई सुरू झाल्यानंतर आलेल्या आहेत.

या संग्रहांतील कांहीं कविता सत्यकथा, वाङ्मयशोभा, वसंत, सह्याद्रि, चित्रमयजगत्, वगैरे नियतकालिकांतून आलेल्या आहेत. या कविता छापण्यास संमति दिल्याबद्दल आम्ही त्या त्या संपादकांचे आभारी आहोंत.

इतक्या लवकर सुबक व सुंदर छपाई करून दिल्याबद्दल "तरुण भारत"चे व्यवस्थापक आणि वैजू सिद्दण्णवर, कंपॉझिटर व भरमा प्रिंटर वगैरे कामगार वर्गाचे आम्ही आभारी आहों.

रसिक वाचक आमच्या या प्रयत्नाकडे सहानुभूतीनें पाहतील अशी आशा आहे.

बेळगांव,
१-५-१९४६.

गो. म. वाटवे
माधव देसाई
शान्ताराम रामचन्द्र

कै. कृ. ल. सोमण ऊर्फ कवि ‘ किरात ’

यांच्या स्मृतीस —

* नवधारा या—सर पहिलिच वळवाची ही
धेम्बांतुन असतिल हिच्या धूलि-कण कांहीं !
परि हीच करितसे वातावरण प्रसन्न,
शमवितें जिवाची तगमग, दाहि दिशाही,
अन् वर्षर्तूचें कुशल निवेदुन जाई !

## ★ वागीश्वरी

शब्द-शक्ति शारदे ! हे कला-विशारदे !
पूजनीं तुझ्याच दे ! रती; नमोस्तुते मुदे
मती इथेंच रंगुदे ॥ध्रु.॥

कालमान वात झोत शब्दसृष्टि हालवीत
रसाळ ही खळाळवी पदीं नदी स-बुद्बुदे

हालवीत लाट लाट पिक कलापि कल्कलाट
निनाद भेदवी दिगंत बकहि त्यास सांथ दे

भव्य काव्य भोंवतीं गगन-चुंबि तरु-तती ?
ज्ञानकोश भारतादि कीं तुझ्या जगामधें !

ज्ञानदेवि पासुनी मनोज्ञ वाग्विलासिनी
तरंगिणींत या तुझ्या मदन्तरंग पोहुंदे

कालिदास वाल्मिकादि लुब्धले तुझ्या पदीं,
तयामुळेंच ना तुला विशेष तीं महत्पदें ?

स्फूर्तिचेच उंच पीठ मंदहसित मूर्त नीट
ललित मधुर झंकृति सुरेल वाजवी पदें

तडित् नभीं कडाडणें सूर्य चंद्र धावणें
बघुन तरी लुकलुकेच तारका जशी मुदें

खगेन्द्र झेप घे तरी भरारणेंच तदितरीं
कुणा न बंध पांखरास साध्य संधि तरि उडे

सुपर्ण, सिंह, अग्रणी विहरुंदे तरिहि कुणी
मरंद-सेवनी वनीं मी तुझ्याच बागडे !
मति इथेंच रंगुदे.

— बाळकृष्ण कोटणीस.

★

## ★ अरुणाचें तेज

युद्धाचा वणवा दिसे चहुकडे या भारता भोंवती,
प्रक्षोभानळ चेतवी जन इथें; लाचार भूमी कढे !
" दास्यीं जी दलितप्रजा जित तिला मी उद्धराया लढे"
ऐसे सांगति सर्व पक्ष समरीं ! दिङ्मूढ झाली क्षिती

क्रांतीचें तव तेज भस्म करण्या ये शक्तिला पाशवी
सर्वांगीण अभूत-पूर्व फुलवी तो क्रांतिचा माण्डव
शक्तीला अतुला अशक्त बनवी त्याचे असे ताण्डव
भूमीनें अभिवादिला अरुण तो, जो तेज आन्दोलवी

केलें सत्यच स्वप्न तें, वितरसी स्वातंत्र्य-तेजोकण,
कर्मासक्ति महोग्र तीं स्फुरविसी निष्ठा किती गाढ ती,
ध्येयार्थी सम राव-रंक, पुरुष-स्त्री, जाति ती कोणती,
तेजानें तव दास्य पाश तुटले; स्वातंत्र्य दे दर्शन !

लोपे तेज मधेच ते....! तरि ठसे ती हाक तें पाउल
नेताजी, तुजला युगप्रतिनिधी केले तिनें निश्चल !

— बाळकृष्ण कोटणीस

## ★ राहूं कशी दूर ?

राहूं कशी दूर ?
रंगलो दंगलो
आह्मी यौवनांत
असह्य वियोग
हा जीव-जीवांत
साहूं कसा घोर ?
राहूं कशी दूर ?

तनू थरारत
ऊर चरकत
वादळीं या जीव
भडकून जात
भोंवतीं अंधार !
राहूं कशी दूर ?

शशी-तारकांना
तुच्छ मी लेखीते
सहस्र नयनीं
हांसती मज ते
काळीज हो चूर !
राहूं कशी दूर ?

— बाळकृष्ण कोटणीस

## ★ अंवसेची रात्र

त्रस्त माझ्या लोचनांनो धैर्य कां तें संपलें ?
आवरेना जें उपायीं पाहिजे तें सोशिलें !

ती किती टोकें सुयांची टोचती डोळ्यांतुनी
नेत्रगोलांची पडावी कोटि शकलें होउनी

बांधला नेत्रां निखारा डागण्या कां दे कुणी ?
ही अशी आहे अवस्था कां शिणावे बोलुनी !

काय हा ज्वालामुखी देह-भू-भागीं धडाडे
होतसे भूकंप माथीं अंतरीं लाव्हा कढे !

फार हो झाला विकारी जाणतो मी पीडित
डोम्ब आगीवीण जाळी जीव हा व्याकूळत

सर्वनाशी कां निराशा बाळगावी निष्फळ ?
निश्चयें येईल दृष्टी 'याचि डोळां' निर्मळ

तीं मधु-स्वप्नें उद्याचीं बाग ती वासंतिक
रात्र ही गेल्यावरी घे चंद्रिकेचें तें सुख !

— बाळकृष्ण कोटर्णीस

## ★ पालवेल तुझी माया

माझें घर येइं सोरें घनदाट अंधारून
तुझ्यां प्रीतीचा प्रकाश जातां नभांत लोपून.
पाहिलें मी दूरवरीं नेत्र माझे विस्फारून
आणि हाय ! सारें नभ राही दाट दगावून.
मेघांच्याही पलीकडे लागे माझी तीक्ष्ण दृष्टी
कडाडोनी बिजली ये धरेवरी जलवृष्टी.
भिजे काया चिम्ब सारी कांपे थरथर हिंवें
हृदयिंचा धीर तुटे मन भाम्बावलें भयें.
जावोनियां घरीं लावी सांजवात धैर्यदायी
मंदावली अकस्मात परी आज दुःखदायी.
मंदावल्या प्रकाशांत उसळल्या पूर्वस्मृति
येती मनीं मागोमाग चित्त व्याकुळलें अंतीं.
जीवनाच्या माझ्या रम्य उद्यानाची झाली होळी
ओतोनिया जीवनातें फुलव तूं प्रेमकळी.
नाहीं आतां सांवराया तुजविण संकटीं या
मनीं आशा राहिली कीं, "पालवेल तुझी माया"

— ना. वि. देशपांडे

## ★ हृदयांत माझिया —

राजसा, वाटतें येउनिया तुजपाशीं
हें मस्तक तुझिया भिडवावें हृदयाशीं.

तव वदन मनोहर भूल घालितें चित्ता
अन् नेत्र ओतिती अखंड मजवर ममता.

मधुबोल प्रीतिचे येता अधरामधुनी
जणुं थेंब मधाचे पसरतात पाझरुनी.

ही तुझी अलौकिक रूपसम्पदा जगतीं
पाहुनी, प्रीतिला अमर्याद ये भरती.

मोहना, मूर्ति मी मनोमंदिरीं पुजिली
निशिदिनीं तियेला भावफुलें अर्पियलीं.

ती मानसमूर्ती आज पाहतां डोळां
हृदयांत माझिया उसळे भाव-उमाळा.

— ना. वि. देशपांडे

## ★ तिमिरांत वृथां कां जासि असा ?

तिमिरांत वृथां कां जासि असा
पाजळतां या दाहि दिशा ॥ धृ ॥

झिमझिमता पर्जन्य ओसरे
मित्रवदन गगनांत संचरें
अवनीवरि आनंद अवतरे
भलतीच हाव कां प्राणेशा ? ॥ १ ॥

नील कमलिनी सलिलीं उमले
किरण क्षणभरी तिथेंच रमले
प्रीतिरतांचें गूढ उकललें
कां पसरसि या हृदयांत निशा ॥ २ ॥

शांत निघाली जीवन-सरिता
चमके मधुनी मुदें नाचतां
शुद्ध दिसे जी प्रकाश पडतां
कां करिसि गढूळ जलास अशा ॥ ३ ॥

— ना. वि. देशपांडे

## * परिदूर....   [ द्राक्षकन्या ]

जग सारें झालें आनंदांत निमग्न
पसरलें चहुंकडे वातावरण प्रसन्न
    परि दूर एकल्या शांत परिसरामाजीं
हीं कितीक हृदयें बसलीं व्याकुळ खिन्न !

घुमतात इथे हे मादक मंजुळ सूर
बेहोषपणाचा इथे वाहतो पूर
    परि दूर एकल्या शांत परिसरामाजीं
हा उष्णाश्रूंचा तुडुम्ब वाहे पूर !

वरि अम्बर चमके असंख्य तारांनी या
लखलखाट खालीं विद्युद्दीपांचा या
    परि दूर एकल्या शांत परिसरामाजीं
अवसेची भीषण रात पसरिते माया !

येईल कधीं का रम्य उषेची जाग ?
त्या शांत परिसरामधली फुलवित बाग !

— माधव देसाई

★ **ओहोटीनंतरची भरती** — [ छंद : जीवनलहरी ]

" काळोख्या रात्रीं तूं
सांगाती येऊन
दाविसी कां प्रीती
मृताला मारून ?
दोघेही प्रवासी
अनन्त काळाचे
मीलन जहाले
आतूर जीवांचे
बेहोष धुन्दीत
लोटले सा मास
उन्मत्त प्रेमाचा
दर्वळे सुवास
—परंतु आलें जें
नको तें निकटीं
लागली तुझ्याही
प्रेमाला ओहोटी
आशेचा उबारा
वाटलें देशील
वृक्षाच्या आधारें
वाढतें ना वेल ?

अदम्य उत्साह
पूर्वींचा लोपून
विश्वास घाताला
झालास कारण !
प्रेमानें दिली जी
ठेव मी ठेवून
प्रत्यक्ष परोक्ष
टाकिसी चुरून
नश्वर जीवित
बाळ हा ओटींत
राहूं का एकटी
अफाट जगांत ?
ठरले, मृत्यूला
देऊन आव्हान
व्हायाचें शेवटीं
अनन्तीं विलीन !
परंतु येऊन
अशा या रात्रीला
काढिशी कशाला
जिवंत शवाला ?"
"ओहोटी मागून
भरती येणार
जगाचा नियम
खोटा का होणार ?

भयाण कातर
रात्रीच्या नन्तर
पहाट गाते ना
गीतेंही सुस्वर ?
संपून रात्र ती
रवि ये वरती
तशीच आली ती
प्रेमाची भरती !
स्वार्थी या जगांत
कोणी न पुसती
कशाला करावी
जगाची या क्षिती ?
ह्मणून सखये
पातलों धावत
अशा या रात्रीला
आसूं मी गाळीत !
राहूं या घेऊन
प्रेमाची दौलत
नन्दन वनांत
अफाट जगांत !"

— माधव देसाई

★ ## आहेर

[ मंदाक्रान्ता ]

आलों जेव्हां सदनिं तव मीं घेउनी काव्य माझें
आहेराला—मम हृदय जें— मी कवी काव्य साजें

डोकावूनी सहज निमिषीं सोहळा तो बघून
तेव्हां झालों चकित हृदयीं नेत्र गेले दिपून.

ज्यांच्या आशा तुजवरि तुझी कीर्ति व्हावी दिगन्त
ज्यांना वाटे अखिल जगतीं तूं खरा भाग्यवंत

आशिर्वादा वदुनि " झडुं द्या नौबती सद्यशाच्या "
वस्तू देती कितिक तुज ते चांदिच्या, काञ्चनाच्या.

आप्त, स्नेही, सुहृद, अथवा पाहुणे सानथोर
देती भेटी सकल जन ते होउनीया उदार

होत्या तेव्हां तुजजवळिं ह्या प्रेमभेटी अनेक
पत्नीला तूं खुलवुनि तदा दाविसी एक एक.

डोकावूनी परत फिरतो, पाहुनीया पसारा—
—वाटें भीती म्हणशिल मला, "भेट ही ? कां चिटोरा ?"

— माधव देसाई

## ★ रेडिओवर अवतार !

[ जुन्या कवींनीं आज फिरून अवतार घेतला आणि आपापलें अवतारकार्य रेडिओवरून जाहीर करण्याचा त्यांना ' चान्स ' मिळाला तर चालू काळाला अनुसरून ते काय काय घोषणा करतील ? ]

जरी घेती अवतार आज । श्रेष्ठ दिवंगत कविराज
कोणासाठीं ? कवण काज ? । श्रोतीं सांगतों परिसावें

**मुकुंदराज—**

विवेकसिन्धूच्या सर्व प्रति । खपल्या, लोटला काळ अति
येत, काढावी नवी आवृत्ति । ह्मणोनि आजि अवतरलों ! १

**ज्ञानेश्वर—**

श्रीनिवृत्तिबंधु ज्ञानेश्वर । अवतरलों जी सत्वर
एक कीं दो ज्ञानेश्वर । तो प्रश्न मिटविण्या ! २

**नामदेव—**

ज्ञानमाउलीबरोबरी । यात्रा केल्या कितीतरी
तीं प्रवास—वर्णनें सारीं । भक्तिभावें सांगण्या ! ३

**एकनाथ—**

ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी । आणखी शुद्ध करण्या बरीं
भिकार भारुडें स्वकरीं । रचण्यालागीं पातलों ! ४

**मुक्तेश्वर—**

अठरा पर्वांच्या मधूनि । शब्दरत्नांच्या लुटुनिया खाणी
वोपिण्या ओंजळी भरोनि । व्यासासहित पातलों ! ५

**दासोपंत—**

माझ्या ग्रंथरचनेसी अफाट । विश्वविद्यालयाची डी. लिट्.
पदवी मिळविण्या झटपट । आज झाला जवतार ! ६

**तुकाराम—**

दंभ, ढोंग, बुवाबाजी । पाखंड—खंडणाचे काजीं
धर्म रक्षावया आजी । प्रयाणकाळ ठरविण्या ! ७

**रामदास.—**

धुळीला मिळालें जुनें राज्यतंत्र
ह्मणोनी मिळालें तुम्हा पारतंत्र्य
हा रामदासी तुम्हा कानमंत्र
पुन्हा 'दासबोधासि' वाचा स्वतंत्र ! ८

**मोरोपंत—**

अवतार आजि झाला रचना कांहीं करून दावावी
साधी सोपी कीं जी बहुजनसंतोषदायि होआवी ! ९

— माधव देसाई

★ चान्द

बाळें आणिक रम्य फुलें
युवयुवतींचीं मुखकमलें ।

विहरे यांसह आनंद,
भूमितलावरिं स्वच्छंद ।

दिन सारा खेळुनि दमलीं,
दिन सरतां झोंपीं गेलीं ।

खेळगडी आनंदाला,
भूवरि मग कोणी नुरला ।

अम्बरिं तारा लुकलुकती,
हर्षाच्या हंसऱ्या ज्योती ।

पाहुनि त्या क्रीडासक्ता,
आनंदा हो उत्सुकता ।

गोल बनोनी तेजाचा
झाला खेळगडी त्यांचा ।

विहरत अम्बरिं आनंद
जन वदती त्याला 'चान्द' ।

— कृ. रा. परांजपे

## ★ पांखरांस

फिरूं नको येथें—पांखरा—घेई गगनिं भरारी ॥ धृ. ॥

रंगदार किति रसाळ पिकलीं ।
फळें गडे या बागेमधलीं ।
मोह मुळीं न धरी ॥ पांखरा ॥

चव घेतांना गोड लागतिल ।
गोड गोड मग गाणीं सुचतिल ।
करतिल घात परी ॥ पांखरा ॥

जागोजागीं कनकपंजरीं ।
राघू मैना घेति लकेरी ।
पोळंति परि अंतरीं ॥ पांखरा ॥

मौज येथली गड्या बेगडी ।
स्वतंत्रतेची त्यांत न गोडी ।
स्वैर विहर अंबरीं ॥ पांखरा ॥

घेउनि गगनीं स्वैर भरारी ।
भूगोलाची करीं मुशाफरी ।
खुल्या दिलाची मार लकेरी ।
स्वैर विहार करी ॥ पांखरा ॥

— कृ. रा. परांजपे

## ★ खेड्यांतील जीवन (सुनीत)

गेली कोमल पालवी करपुनी नाचे उन्हाळा वनीं
झाली ऐन दुपार आग फुलुनी आली चहूंबाजुनीं
आटे रानझरा कुठेंतरि कशी किंचाळते कोकिळा
खेड्यांतील अबोल त्या नवतिचा कोमावला कीं मळा

आशा ती सुटली कुणास जगतीं झोंबे निराशा जरी
भोळा शेतकरी निगा जमिनिची राखी फुटोनी उरीं
धीराचा हलकेंच हात धरुनी बांधाकडेला बसे
शोकें व्याकुळ सृष्टिची अवकळा त्याच्या मुखीं येतसे

दुःखाचे घुटके गिळीत चघळी ओली सुकी भाकरी
आणोनी उसनी उमेद उचली पाऊल कष्टावरी
जाणारा दिन देत साज चढत्या चिंता श्रमांचे मनीं
वाटें अंधुक वाढल्या गरिबिचा चाले घरा तो धनी

घाली भूल निशा उठे दचकुनी स्वप्नीं जिणें नागरी
त्याचें चित्र सुरेख रेखित परी माया रमे नागरी

— सी. म. बापट

## ★ चल पुढें !

चल पुढें अतां तूं
झरझर पाउल उचल गडे !

ओढ जिवा लागे सजणी, ये
चाहुल घे हळुं हांस झणीं
साद पुकारित पुढतीं जातां
मधुर मना तें स्वप्न पडे

बिकटच भासे वाट यशाची
चढाओढ ही जगण्याची
सोबत देतां सुंदर आशा
प्रकाश पसरी चोहिंकडे

निशाण धरुनी आवडीनें
घाव झेलूं जोडीनें
शिखर उंच हें धीरें चढतां
चौघडा प्रीतिचा उरीं झडे

— सी. म. बापट

## ★ सारंगीचे सूर

[ जाति — मेघावली ]

[ रुबाया ]

१

वनांत नाचे समोद मोहक मोर
मुरकत गगनीं चपलेचा मन चोर
चोंच पसरुनी उगाच चातक राहे
तळमळतां मन मधुता येत समोर

२

प्रेमनगरचा येत मुशाफिर गात
तिनिसांजेची खुले छटा मेघांत
कशी कळेना खूण जिवाची तुजला
काढूं दे मज इथें एक ही रात

३

जुनें आज तें नवेंच होतें काल
नवें आजचें जुनें उद्यां समजाल
पेरुनि पोकळ वादाचे परि कांटे
घेउनि तोंडें कुठेंतरी मग जाल !

४

उसळे सागर, कसलें वादळ माजे
नभीं घनांचा घोर दुंदुभी गाजे
        नाव फुटे तरि नाचत लाटांसंगें
पैलकिनारीं चढे कलेवर माझें

५

क्षितिजावरली विरघळली रविकांति
वळे निशा तशि जळे अंतरीं शांति
        रुधिराश्रूंनीं मानवता ही न्हाली
गर्जे जीवन असो चिरायु क्रांति !

६

बागेंतिल या गुलाब गळुनी गेला
मंद वायुनें सुगंध चोरुनि नेला
        चंद्रबिंब हें अजुनी नाहीं ढळलें
मधुराणी भर अखेरचा हा पेला

७

दिवस मावळे घरहि राहिलें दूर
दीप दिसेना काळ हंसे भेसूर
        पाय उचलतां धीरें तिमिरामधुनी
घुमती मंजुळ सारंगीचे सूर

— सी. म. बापट

## * मूक प्रेम

उभी राहूनि अपुल्या दारीं—
गाली हंसते, सहज सुंदरी ।
क्रम चाले हा, अन् गेले दिन
योग न आला, नच हो भाषण

स्वभावता लाजऱ्याच नारी
मुग्ध तयांची प्रीत वैखरी ।
बोलायाचा हिय्या करूनी
शब्द टाकला अचुक योजुनी

" हृदयस्वामिनी, सखे साजणी !
प्रिती-तहाची करूं बोलणी " ।
हांव भाव ती करि किंचाळुनी
मूकी बापुडि !....सर्द, मी मनीं !

— शंकर भस्मे

## ✶ जरी होतास जायचा...!

जरी होतास जायचा नादीं लावूनिया मला
तरी कशाला जीवनीं माझ्या आलास प्रेमला ?
मांडिली मी हरखून पूजा तुझी मानसांत
नाहीं जाहली सांगता तोंच गेलास परत !
प्रीती-लतिकेचा उरीं गेला गळून मोहर
नाहीं फिरून यायचा कळ्या फुलांचा बहर !
स्फुरलेली मनोमनीं भाव-गाणीं हळुवार
नाहीं आतां व्हावयाची नाद-ब्रम्हांत साकार !
नेत्रीं दाटलेलीं जलें नेत्रांतच आटायाची
जींवा-भावाची बोलणीं ओठांतच विरायाची !
पूजूनिया, प्रीतिदेवा ! प्रेमें तुला वहायाची
सारी भावनांची फुलें हृदयींच सुकायाची !
अंतरांत कोरलेली मूर्त तुझी पहायाची
जीवनांत एकटी मी एकटीच रहायाची !

— राजसा

# निर्माल्य

आसावल्या हृदयानें हिंडताना रानींवनीं
हळुवार भावनांची दिसलीस निर्झरणी !

दाखवून गालावर गोड इवलाल्या खळ्या
हृत्कमळाच्या माझिया फुलविल्यास पाकळ्या !

निष्ठागर्भ नजरेचा जीवा लाविलास ळळा
क्षणाक्षणास दावी ती तुझा जीवींचा जिव्हाळा !

दाटलेल्या कंठांतून जल भरलेल्या डोळां
दाखविला बोलून तूं तुझा मनींचा उमाळा

प्राशिली मी प्रीती-सुधा साऱ्या हांसल्या भावना
जीवाजीवाच्या नी दोन्ही पटल्या ग खाणाखुणा !

पटे हृदयाला, तूंच हृदयाची अधिराणी
मांडिली मी आवडीनें पूजा तुझी मनोमनीं !

वाहियली तुझ्या कंठीं प्रीती-सुमनांची माळ !
तुंवा तुझ्या आसवांनीं फुलविली वेळोवेळ !

तीच माझी माला आज टाकिली तूं पायदळीं
तुझ्या अश्रूजलाविना फुलें वाळून तीं गेलीं !

वाटतो ना खेद मना जरी सुकली ती माला
जहालें ग निर्माल्य तें देवी ! तुझ्या पदतळां !

तुझ्या कंठींचें भूषण हेंच तियेचें जीवन
आणि तुझेंच चरण तिच्या निर्माल्याचें स्थान !

इतरांच्या पदीं कधीं नाहीं ग ती पडायची
पदीं पडून दुजांच्या नाहीं कधीं सुकायची !

करावयास निर्माल्य माझा प्रणयाचा हार
तूंच समर्थ देवते ! तुझाच तो अधिकार !

— राजस

★

## ★ जीवन–संगीत

जहाला न खेळ पुरा   करूनिया अशी त्वरा
उडूनिया भुर्रकन्   कुठें गेलास पांखरा ?
तुझ्या माझ्या गायनानें   नादली ही घनराई
डोलविल्या तरु,लता !   हांसविल्या जुई, जाई !
प्राण कोणाचें लोभलें ?   कुणी घेऊन चाहूल
तुझ्या भाबड्या मनाला   अशी घातली रे भूल ?
आली अवचित अशी   शीळ कोणाची कुठोनी
भारूनिया जीव तुझा   तुला घातली मोहिनी !
हरपलें देहभान   प्रीत माझी विसरून
एकटाच अवकाशीं   दूर गेलास उडून !
भाम्बावला जीव माझा   वृत्ति झाल्या वेड्या पिशा
भिरभिर हिण्डुनिया   धुण्डिल्या मी दाही दिशा !
जगताच्या कोनाकोनीं   तुझा लागला न थाङ्ग
आसावल्या लोचनांचे   नाहीं फिटले रे पाङ्ग !
एकला मी आज इथें   भरूं पाहतसे सूर
हृदयाच्या तारांतून   परी उठती बेसूर !
सूर–संगती ही सख्या !   झाली आतां विसंगत
असेंच हें चालायचें   माझें जीवन–संगीत

— राजस

✶ # “ छाया-प्रकाश ”

मी अन् तू अभिनव कुशल चितारी । रंगवू चित्रांच्या हारी ॥ धृ ॥

संसाराच्या रम्य पटावर, वधुवर प्रीतीच्या वेदीवर ।
हें पहिलें, रेखित चित्र चितारी ॥ रंगवू ॥ १ ॥

नवजीवनिं या पहाट झाली । चोंहिकडे अरुणाची लाली ।
रविकिरणीं, हांसत वसुधा सारी ॥ रंगवू ॥ २ ॥

वृक्षावरती बुलबुल जोडी । चोंचित चोंची, पंख पिसारी ।
कुजबुजती, मंजुळ घेती लकारी ॥ रंगवू ॥ ३ ॥

जोडा विहरे विहङ्गमाचा । गगन पुरेना त्यांच्या नाचा ।
तें गाती, घेती स्वैर भरारीं ॥ रंगवू ॥ ४ ॥

भवसागरिं ही जीवन नौका । डौलानें घे झोका ।
हा नावाडी, तीच सुकाणुं हकारी ॥ रंगवू ॥ ५ ॥

भीषण सोसाट्याचा वारा । वर्षति वरुनी संकटधारा ।
नच ढळती, घडि ती हृदय विदारी ॥ रंगवू ॥ ६ ॥

दिन रजनीची अभिनव जोडी । प्रकाश दे छायेला गोडी ।
स्त्री पुरुषा, होय तशी सहचारी ॥ रंगवू ॥ ७ ॥

— सौ. आनंदीबाई लेले

## ✶ गंगालहरी

[ शिखरिणी ]

नरांचें जी वारी भव-भय झणीं दृष्टि पडतां ।
तुझी मूर्ती जीचा कवण महिमा गात पुरता ।
उमेच्या क्रोधानें अवगणुनिया नित्य परि तो ।
शिरोभागीं शंभू सतत तुजलागींच धरितो ॥

निघालीसी विष्णू-चरण-कमलाहूनि विमला ।
शिवाच्या भालीं गे अविरत घडे वास तुजला ।
पतीतोद्धाराचा तुज सतत हा छंद जडला ।
तुझा व्यापोनी हा महिस महिमा पूर्ण उरला ॥

नद्या शैलाहूनी कितिक तरि आल्या महिवरी ।
पहा अन्या कोणी तुजविण वसेना शिवशिरीं ।
कुणी श्री विष्णूचें चरण धुतलें गे स्व-सलिलें ।
नदीची कोण्याही तुजसि तुलना सार्थ न मिळे ॥

अनाथ स्नेही तूं, गलित-गति मी पुण्य गतिदा ।
जगोद्धर्ती तूं मी पतित गद मी, भेषज सदा ।
सुधा-सिंधू तूं मी तृषित जननी बालक असें ।
तुझें पायीं आलों शरण, करिं आतां उचितसे ॥

जटाघातें जीच्या तरल लहरी मंद उठती ।
शिवाच्या नृत्याशीं समुचित जणूं भाव करिती ।
ध्वनीं लाटांचा जो घुमत, डमरूनाद गमतो ।
हरो तापां, तूझा त्वरित जननी नृत्यविधि तो ॥

— सौ. आनंदीबाई लेले

★ **स्वप्नतरङ्ग** — [ छंद—जीवनलहरी ]

दडवुनि तुज अन्तरांत
पडलो मी धरणीला
आंठव तव येत मनीं
हर्षखेद मावळला

नीलाम्बर पांघरुनी
येत हळूं हळुं साकी
स्मितवदनें देत मला
मद्य ओतुनी चषकीं
जडतेचें भान नुरें
स्वर्ग भूवरीं उतरें
पटल होत दूर दिसें
दुर्लभ जें या लोकीं


ग्रंथ

मधुघट घेउनि हातीं
ये वसन्त उद्यानीं
दङ्ग नर्तनीं निर्झर
द्विज रमले मधुगानीं

घेउनि तव कर हातीं
पाहत त्या वृक्षतती

रास फुलांची तुडवित
फिरलो किती उद्यानीं

आलो कासार तटीं
मधुर जलें जें भरलें
शुभ्र हंस मिथुनांनीं
कमलवृन्द शोभविले

गालाला गाल जुळें
प्रतिबिम्बा पाहियले

देहीं रोमाञ्च उभे
वलय जळीं बघ उठलें

मखमालीतुनि हिरव्या
तोंच काय सळसळलें !
आणि शिवे भीति मना
देह निरन्तर झाले

मांसल तव बाहूचा
स्पर्श किती सौख्याचा
अन् उरोजस्पन्दन तें
धुन्द करी मज बाले

बसलो सुन्दर यानीं
हंस जया जोडियले
मेघमण्डलावरुनी
तारागण देखियले

वसुन्धरेभंवतालीं
रुंजि सुधांशू घाली
पाहुनि तूं हासलीस
मन्मन कां बावरलें ?

जावयास निघसी तूं
पदर तुझा सळसळला
हृदयीं काहूर उठें
नूपुरध्वनि रुणझुणला

दिसती मम नयनाते
तेजःकण चमचमते

स्वप्नमालिका तुटली !
पडलो मी धरणीला !

— गो. म. वाटवे

★

## ★ ओसण्डते ज्वानी .... !   [ जाति : वल्लभा ]

ओसण्डते ज्वानी खुलें तव वर्ण लोभस सांवळा
रसराजदैवत मूर्त तूं गमसी मला रम्योज्ज्वला

कमनीय सौष्ठव लाविते मजला पिसें कसलेंचसें
ऋजु नासिका मृदु ओष्ठसम्पुट पाहुनी मन उल्हसें

सित रेशमी तव अञ्चलाची हो मनोहर सळ्सळ
ये धुन्दता वृत्तीवरी चित्तांत माजे वादळ

परि पाहतां तव आर्त दृष्टी बावरे मी गोंधळे
कां दीर्घ हा निश्वास आतां सोडिसी मज ना कळे

ही आर्तता दावी तुझ्या हृदयांतली परिदेवना
तव भाव होई व्यक्त कां ही चालवीसी वञ्चना ?

कां शून्यवृत्ती दाविसी ? तट कां समोंतीं घालिसी ?
जग जिंकिले ज्यानें तयाला काय बन्धन घालिसी ?

सम्पेल यौवनग्रन्थ अन् होईल नीरव कोकिला
जाई वसन्तामागुनी रसगन्ध या सुमनांतला

भर पात्र कांठोकांठ हो मग धुन्द सगळें प्राशुनी
शिशिरांतलें फेकूनि दे वैराग्य आतां भामिनी

— गो. म. वाटवे

## ★ क्षण एक ... !

[ द्राक्षकन्या ]

क्षण एक पडूंदे माझ्या कण्ठाभंवतीं
उत्फुल्ल नीलनलिनांची नाजुक माला
लाभुं दे मला क्षण परिमल तव श्वासांचा
मग आनन्दानें धुण्डिन सागरवेला

क्षण थाम्ब ओत मधु सुरम्य सुरईमधुनी
उसळुं दे फेंस भर हेमपात्र हें पूर्ण
पी अल्प तयांतिल ठेव मला अवशेष
अन् नैवेद्यावर कृतार्थ मी होईन

वर्षावत जीवन इकडे अमृतमेघ
क्षण एक वळूंदे करुंदे चिम्ब तनूला
सांठवूनि हृदयीं अल्पक्षण सौख्याचे
होईन सिद्ध मी कण्टकपथ वरण्याला

ध्यानस्थ उभा मी तव तीरावर सरिते
क्षण एक थाम्बवी प्रवाह अविरत अपुला
प्रतिबिम्ब पडूंदे क्षणभर तव हृदयांत
अन् खुशाल जा मग रत्नाकरभेटीला !

— गो. म. वाटवे

★ **पुष्ट तुझ्या बाहूवरि . . . !** [ छंद—जीवनलहरी ]

पुष्ट तुझ्या बाहूवरि
नवनवती रसरसली
स्वर्णकङ्कणाभंवतीं
शामल कान्ती खुलली

सुमकोमल सुखशीतल
करस्पर्श तव असेल

येत कल्पना देहीं
रोमावलि बघ उठली

घेतां तव कर हातीं
धगधगली मम काया
सुखशीतल स्पर्श तुझा
शान्तवृत्ति ने विलया

अणुंअणूंत सांठवले
घट चेतनमय सगळे

कडकडुनी होत एक
नित्यगायना गाया

शान्त जाहला होता
सागर मम हृदयाचा
आणि संपला होता
क्षोभकाल पर्वाचा

तोंच सुटे झंझानिल
खळबळलें शान्त सलिल

विद्युत् तूं पातलीस
करिसि दाह अंगाचा

थरथरली सत्त्ववेल
बलशाली सुताशा
नतन गतस्वप्नांचें
दावि मनोहर वेषा

स्नेहमधूनें भरला
पद्मराग कीं द्रवला

चषक लाविला ओठीं
अन् सरलें स्वप्न निशा !

— गो. म. वाटवे

## ★ क्षितिजाच्या पलीकडे —

[ ओवी—छंद ]

क्षितिजाच्या पलीकडे जेथ धूसर धूसर
पाहोनी मना ये धीर तेथ आहे माझे घर
क्षितिजाच्या पलीकडे जेथ थवे न पक्ष्यांचें
भिरभिरोनी फिरती तेथ आहे नीड माझे
क्षितिजाच्या पलीकडे लालरेषा जेथ गुप्त
प्रकाशकिरण थांबे तेथ माझे नीड सुप्त
क्षितिजाच्या पलीकडे मित्रकिरण पोचेना
तेच घर माझे जेथ दीप काजळ ओकेना
क्षितिजाच्या पलीकडे पर्जन्यही न वर्षावे
वायु थांबे दमोनिया माझे घर कुणा ठावे ?
क्षितिजाच्या पलीकडे निशा भिते जावयाला
घर माझे तेथ उभे संरक्षण अर्पायाला
क्षितिजाच्या पलीकडे मनोराज्य जेथ विरें
स्वयंप्रकाश तेजानें घर मात्र तेथ उरें
क्षितिजाच्या पलीकडे मज जावयाचें दूर
नग मधे जरी उभे घर मना देई धीर
क्षितिजाच्या पलीकडे आस माझी स्थिरावली
अनिमेष नेत्रपंक्ति समाधानें विसांवली
केव्हांतरी मी जाईन क्षितिजाच्या पलीकडे
मिळवावयातें घर मन माझे होय वेडे

— शास्त्री

* ## "जप"

नच अमित वैभवें दिलीस करुनी तपा
ही करुणामूर्ते तुझीच घडली कृपा

शीतवृष्टि झाली पर्ण सकलही गळें
थडथडे कलेवर जीर्णसंधि मोकळे

दांतखीळ बसली रुधिर सकल गोठलें
निष्पत्र तरूपरि अवयव हे ताठले
मनि सुधामधुर नामाच्या करितो जपा

अविरता कोसळे धारा मुसळापरी
संसार बुडाला कोठें न दिसे तरी
लाटेंत उडालो अम्बरिं काष्ठापरी
मग खालीं दडपे जलराशी सुंदरी
अति भ्यालो परि नामाच्या करितो जपा

कीं सहस्रनेत्रां आदित्ये उघडिले
जाळ हा उसळला कोमलपल्लव जळे
कडकडे तरु स्फुल्लिङ्ग पताका किती
अम्बरासि जिव्हा ज्वाळा या चाटती
चर्म हें जळें मनिं माधुर्याची प्रपा

शून्यता स्मशानापरि येथें पसरली
ही निशा तमानें वेगभरें वाढली

या दिवाभीत-शब्दासि ऐकतां त्वरें
शून्यता तमानें जीवभयें हादरे

परि तुलाचि शोधावयासि करितो जपा

या तिमिरसागरीं सर्व सर्वही बुडे
तंव नभीं घनांनीं वाजविले चौघडे

वरि सोसाट्यानें वायू नर्तन करी
झोंपडीवरी मम काडिहि नुरली परी

मनिं चरचरलें परि स्मरतो करुणातपा

कडकडाट् झाला धरणी ही डळमळे
तंव अनल भुजगीं फणासि संकोचिले

चेतन जड झालें एक, दृष्टि दिपविली
तप्त हेमरेषा वज्रकांति तळपली

मृततुल्य हंसे मी, त्यजिले न परी जपा

जरि मधुर दर्शनें विरघळलो अंतरीं
उन्मत्त जाहलो, भीति नुरे रे परी

मज कोण आवरे, मृत्यू मंगल दिसे
जीवनीं भग्नता, वाटे जडलें पिसें

आवेश वाढला रौद्र नर्तनामुळें
क्षुद्रभूमि चिरडुनि सुकविन सारीं जळें

वायूसी उडवुनी, तेजगोल दिपवुनी
कवळीन मुठीमधि, नभस्तला रोवुनी

मजसि कोण पाहिल कोण निराळा उरे
ही मम स्वरूपें प्रतिबिंबची कांपरें

परि पूर्वाभ्यासें, करितो अजुनी जपा

— शास्त्री

★

## ★ न्हावया पाहतो अनन्तीं लीन !

डोङ्गरापर्यंत समोर माळ
विरल तरूञ्चें शेजारी जाल

एकल्या वायूची सोबत गूढ
एकलेपणाचा आनंद गूढ !

ताम्बूस संध्येचें विशाल फूल
क्षितिजावरतीं होत मलूल !

आणि तिमिराचें चोरपाऊल
माझियावरून— हलकें फूल—

—कधींच गेलेले; आणि भंवतीं
निशेचे तराणे दुमदुमती !

मागें राहिलेलें दूरच दूर
कोलाहल-कुन्द क्षुब्ध नगर !

आलाप विलाप कटु-मधुर
मागें राहिलेले दूरच दूर !

सूडाची, प्रेमाची, लोभाची आग,
आशानिराशांची कण्टक–बाग,

हेऱ्यादुष्टाव्याचे, —सारेच सूर
मागें राहिलेले दूरच दूर!

पहा अर्धगोल समोर पूल
आगगाडांचे ते खालतीं रूळ,

कोट्यवधि वेळां ज्यांच्यावरून
गेलेली गाडी ती धडधडून!....

येतात जातात पुलावरून
प्रखर तेजाचे झोत फेकून—

—कितीक मोटारी; माझें परंतु
लक्ष्य वेधणारा एकच तन्तु:

—पुलाच्या पायाशीं रूळालगत
तडाग तीराशीं कुजबुजत!

तटीं एकुलता विजेचा दीप
तमाच्या दरींत करीत तप!

उभारी जळांत त्याचें तें बिम्ब
तलावभरून तेजाचा स्तम्भ !

स्तम्भावरी त्या तो लावून दृष्टी
विसरूं पाहतो अवघी सृष्टी !

विसरूं पाहतो स्वतःचें हीन
भङ्गुर स्वरूप क्षुद्र, करुण !

विसरूं पाहतो उल्केचा ध्यास
जाळींत सदा जो बसे उरास !

विसरूं पाहतो आकाङ्क्षा, आशा,
सुखें, दुःखें, तशी तीव्र निराशा !

विसरून आत्म— वास्तव्य दीन
व्हावया पाहतो अनन्तीं लीन ! !

— शान्ताराम रामचन्द्र

## * धडपडतें जननास्तव ...

धुमसतसे काय असें
अंतरांत आंत आंत
धडपडतें जननास्तव
गुदमरुनीं काय आंत ?

रात्रीच्या उदरांतुन
कलिकांच्या कोशांतुन
वीणेच्या तारांतुन
वेणूच्या कंठांतुन
रत्नांच्या तेजांतुन
स्वातीच्या थेंबांतुन
—उमले जी सुंदरता
हें तिचेंच का नर्तन ?

वा खवळुन नाचतसे
दशदिशांत उठवि कहर
लाटांना उधळितसे
उल्कांचे जेथें थर
तडितांच्या चरणांनीं
हुंदडतों विश्वावर
झंझावातांतिल त्या
मद का हा अतिमंथर ?

कुस्करुनीं सुमनांचें
अंथरलें मृदुल शयन
दृष्टीचें जरतारी
देहावर एक वसन
उत्सुक बेहोषपणें
गात्र गात्र धुंद, म्लान,
त्या पहिल्या रात्रीतिल
का हें उन्मादगान ?

सुकलेल्या नेत्रकडा
मग कां ह्या ओलवती ?
अश्रुमलिन अधरींही
कसलीं हास्यें स्फुरती ?

मानवतेस्तव चाले
संतत बलिदान जेथ,
रुधिराचा, अश्रूंचा,
झालेला चिखल जेथ,
तेथें जें तेजस्वी
पुष्प उमलणार असे
अस्फुट त्या गंधाची
प्रिय ही चाहूल असे ?

धुमसतसे गंध तोच
अंतरांत आंत आंत
धडपडतें जननास्तव
पुष्प तेंच खोल आंत !

— शान्ताराम रामचन्द्र

## ★ कणिका

बघ इंद्रधनूची कमान ती गगनांत
बघ सात रङ्ग ते खुलुनि कसे हंसतात
—रे काय आपुला आदि, अन्त, त्या ठावा ?
क्षणभङ्गुरतेची शिवे काय त्या खन्त ?
—चल हास, गुम्फुनीं हात सख्या हातांत !

क्षण महाल भिडतीं स्वप्नांचे गगनाला
क्षण हातीं येतो स्वर्गसुधेचा प्याला
—ओठांस लावितां निखळुन हातांतून
शतखण्डित होतो रत्नजडित तो प्याला
उरिं नन्तर सलतीं शकलें तीं हृदयाला !

— शान्ताराम रामचन्द्र

✶ नकळे तरी कां —

पहिल्या भेटींत
लोचन भिडले
स्वर्गाचें स्वरूप
प्रकट जाहलें !

क्षणांत रेशमी
कीटकांसमान
प्रीतीच्या धाग्यांनीं
गुन्तलों आपण !

विरला भोवतीं
विश्वाचा कल्लोळ
चिन्तांचे, आशांचे,
थाम्बले हिल्लोल !

परन्तु नन्तर
कवच फुटून
अघोर सत्याचें
जाहलें दर्शन !

—प्रेम कां संभवे
प्रथम-दर्शनीं... ?
जगाचे शब्द हे
घुसले श्रवणीं !

भासांची दुनिया
उजाड होऊन,
उडालीं पांखरें
निमिष गाऊन !

पाङ्गलों आपण
पाङ्गलें जीवन
कितीक वसंत
वठले फुलून !

तरीही आज कां
होतांच स्मरण
दाटतें काहूर
भिजती नयन.... ?

—प्रथमदर्शनीं
प्रेम न सम्भवे,
नकळे तरी कां—
पोटांत कालवे ! !

— शान्ताराम रामचन्द्र

★ **घाटांतून —** [ द्राक्षकन्या ]

हा डाव्या बाजुस पहाड उंच उभार
अन् उजव्या बाजुस कड्यास आली धार
ही वाट चालली मधून वळणें घेत
—ही चढण भयङ्कर कधीं न का सरणार ?

पायथ्यापासुनीं दिसुनीं शिखरीं तारा
उल्हास दाटुनीं चढलों चढण भरारा
—परि मधेंच वेंधे घन अटवी तिमिरांत
नच दिसे चांदणी, चुकलो गमतें वाट !

पथ अरुंद होतच क्षणोक्षणीं हा जाय,
काट्यांनीं अन् रुधिरानें भरले पाय !
—सिंधूत तमाच्या गोते खाई आस,
उचलवे न पदही; – जिणें हेंच कीं काय ?

“ हें जीवित ” ह्मणुनीं झेंप घालण्या जाणें
पद घळींत पडुनीं भासामागें पळणें
अन् नंतर बांधित जखमा, हात ललाटीं—
ठेवूनीं बसणें स्वस्थ; – आमुचें जगणें !

हें कसलें जगणें ? मरणच तें ! चल पुढतीं
—समरास सज्ज जे त्यांना कसली भीती ?
—देहाची होवो चाळणही जखमांनीं
चढ अनन्त मरणें मरुनहि वरतीं वरतीं.... ! !

*— शान्ताराम रामचन्द्र*

## ★ सम्भवतें तरि का —

उधाळिल्या गिरीशा प्रमत्त लाटा गगनीं,
गम्भीर नाद घुमविला दिशांच्या कानीं;
—सम्भवतें तरि का कधिंकाळीं होइन मी—
बुडबुडा क्षणाचा जैसें जग हें मानीं ?

ओञ्जळींत अपुल्या सुगंध उज्ज्वल भरुनी,
निःश्वसितें माझीं गेलीं हृदयामधुनीं;
—सम्भवतें तरि का कधिंकाळीं होइन मी—
रानटी बगीचा जैसें जग हें मानीं ?

विन्धिला तिमिर अन् त्रिभुवनास उजळोनी,
प्राचीस सजविली अनुपमेय लेण्यांनीं;
—सम्भवतें तरि का कधिंकाळीं होइन मी—
काजवा क्षुद्र तो जैसें जग हें मानीं ?

उडविले विहङ्गम दशदिशांस येथूनी,
गाइलीं तयांनीं मंजुल मङ्गल गाणीं;
—सम्भवतें तरि का कधिंकाळीं होइन मी—
घुबडांचें घरटें जैसें जग हें मानीं ?

त्या अनंत विश्वामधुनीं ध्वज नाचवुनी,
चमकलो स्वशौर्यें; –आली विश्वें नमुनी ?
—सम्भवतें तरि का कधिंकाळीं होइन मी—
जागृतींत बन्दी जैसें जग हें मानीं ?

रे जगा, आणिशी ज्ञानाचा कां आव ?
तूं अजुनी असशी अंड्यामधला जीव !
गर्वोक्ती नच हीं; बडबड नच वा व्यर्थ—
कीं, विराट नवनव रत्नांचा मी देव ! !

— पांडुरंग सूर्यवंशी

★

## ★ स्वप्नामागें —

उगाच कुठल्या स्वप्नामागें
बांधुन बसशी स्मृतिचे धागे ?

खडकाळींतुनि खिदळत आली
निर्झरणी बघ तुझ्या पदतळीं !

अवहेलुनि तिज सुधेमागुतीं
पळविशि आशा कां वेगवती ?

जोंवरिं आहे नीर प्रवासी, —
तहान घे शमवून तोंवरीं; तहान घे शमवून्
आटल्यावरी एकदां खुळ्या, —
मिळेल ना धुण्डून कदाचित् मिळेल ना धुण्डून् !

उगाच कुठल्या स्वप्नामागें
बांधुन बसशी स्मृतिचे धागे ?

फुलें हांसतीं तुझ्या भोंवतीं
धुन्द डोलुनी तुला बाहती !

तरीहि झांकुनि हृदयकवाडें
जाशी कुठल्या सुगंधाकडें ?

जोंवरिं आहे गंध प्रवासी, —
खुशाल घे हुङ्गून तोंवरीं; खुशाल घे हुङ्गून्;
झडल्यावरतीं धुन्द पाकळ्या
जातिल कोमेजून प्रवासी, जातिल कोमेजून् !

उगाच कुठल्या स्वप्नामागें
बांधुन बसशी स्मृतिचे धागे ?
प्रकाश नर्तत जागोजाग
आणण्या तुझ्या हृदया जाग !
अजुनी घेशी कशाला परी
पांघरूण हें तमाचें वरी ?

जोंवरि आहे तेज प्रवासी,
हृदया घे उजळून तोंवरीं; हृदया घे उजळून्;
क्षितिजावरचे किरण लोपतां
दिसतिल ना परतून कदाचित् दिसतिल ना परतून् !

उगाच कुठल्या स्वप्नामागें
बांधुन बसशी स्मृतिचे धागे ?
मूर्तिमन्त जें, तें सोडुनियां
कल्पनेंतलें जाशी घ्याया !
चंद्रासाठीं हट्ट कशाला;
स्वप्नामागें धांव कशाला ?

जोंवरि आहे स्वप्न प्रवासी,
खुशाल जा रङ्गून तोंवरिं; खुशाल जा रङ्गून्;
स्वप्नान्तीं चंद्रिका विसरुनी
स्वागत कर हांसून उषेचें; स्वागत कर हांसून् !

— पांडुरंग सूर्यवंशी

## ★ परि आज —

[ द्राक्षकन्या ]

दावानळ होता गिळित रान घोटांत
कोलाहल उठला त्यांतुन दुर्बळ, आर्त;
तें दृश्य देखुनी निर्विकार मुद्रेनें
मी पुनरपि झालो तोऱ्यांतच मार्गस्थ !

शमवुनी प्रथम मी तृषा पाहिले भोंतीं
तों तीरावर कोळ्यांच्या दिसल्या पंक्ती;
हांसुनी निरखिल्या दुर्बळ त्या मासोळया
ज्या गळ तोडाया व्यर्थ लाविती शक्ति !

कधिं नकुल अहीवर, अहीहि नकुलावरती
त्वेषानें चढवी हल्ले हल्लयावरती;
मातींत मिसळला नाग छिन्नविच्छिन्न
करमणूक केली घटकाभर त्यांवरती !

दलितांस रगडिती दातांखालीं मत्त
असहाय्यता रडे धाय मोकलुन तेथ;
—जाणार काय मम कांहीं होवो त्यांचें—
बघितली सुरक्षितता मी माझी फक्त !

परि आज ? – ऊर हें थबथबतें दुःखानें
ओठांवर स्फुरतें करुण, लाजरें गाणें :
—कीं, हंसलों नसतों जाळ्यांतिल दाण्यांना
तर होते नच नरकाचें इतुकें देणें !

— पांडुरंग सूर्यवंशी

## ★ हिन्दोळयावरची आस —

हिन्दोळयावरची आस-परी
अनुरक्त न अजुनी कुणावरी !

पंचमहाभूतें भंवतालीं
कर जोडुनियां उभी राहिलीं,
क्षणभर त्यांना उसंत नुरली,

संतुष्टता न परि तिच्या उरीं,
अजुनीहि शोधिते कुणातरी !

अनन्त जीवा सदा फसविते
निज पाशांनी तयां ओढिते
लक्ष्मी ती पदिं लोळण घेते

परि पडली तिचिया न पंजरीं
नित मुक्त धांवते वायुपरी !

हेममणी-विभुषित पात्रांतुन
सुधा चालली जरि ओसण्डुन
—लालस रमणी देती आणुन

तरि निवली न तृषा तीळभरी
वाढते असीम नि परोपरी !

जनझुंडी नित ज्याच्या दारीं
असें यश सदा उम्बऱ्यावरी
उभें घेउनी आरती करीं

क्षितिजांत तियेची दृष्टि परी
ढग भेदुनि जाई खगापरी !

मृदुल सुमांची शय्या केली
उशालगत चन्दन तनु जाळी
—धूसर चामर सन्तत ढाळी

अस्वास्थ्य हुंदडत तरिहि उरीं
तें तुफान जैसें सिंधुवरी !

हिन्दोळा ही पुढतीं मागें
अस्मानावर चढवी वेगें
निकटीं बसण्या प्रेमी अवघे—

खालतीं ताटकळलेत परी
अनुरक्त न त्यांवर आस-परी ! !

— पांडुरंग सूर्यवंशी

## ★ कुणापुढें दावूं भाग्य माझें –

बहुत दिसांनीं आले मी माहेरीं
परंतु पायरी चढवेना

स्मृति माउलीची होउनीया मनीं
आसवें लोचनीं खळाळली

आणि दारांतच अडखळे पाय
घरामाजि माय नाहीं माझी

गोकुळासमान होतें हेंच घर
परंतु कान्तार आतां भासे

पिसाटासारखी घरांत मी फिरे
परी उभे वारे सुटताती

खजिने सौख्याचे साठले अन्तरीं
पहावया परी नाहीं आई

आनंदाचें गीत कुणापुढें गाऊं
कुणापुढें दावूं भाग्य माझें

— सौ. शालिनी सोमण

## ★ मधु आशा हृदयीं....

मधु आशा हृदयीं करीत होत्या नाच
माहीत जिवाला नव्हता मुळि भवजाच
क्षणिं एका बदले परी भाळिंची रेषा
अन् जिवास जाळित येई घोर निराशा !

मधु स्वप्नें होतीं तरळत नयनापुढतीं
मन दङ्ग जाहले होतें अभिनव जगतीं
क्षणिं एका बदले स्वप्नरचित ती सृष्टी
अन् रुक्ष सहारा करी जिवाला कष्टी !

मधुगीतें होतीं नाचत ओठावरतीं
मन पोहत होतें सूर-सागरावरती
क्षणिं एका पडला कण्ठाभंवतीं फास
अन् गीत गावया कुठला मग अवकाश ?

त्या तीव्र निराशेतुनी जन्मला त्याग
विकसली सहाऱ्यातुनि मानवता बाग
उमटलें गळ्यातुन स्वातंत्र्याचें गान
लाभलें जिवा मग अमोल शान्तिनिधान !

— सौ. शालिनी सोमण

★ ## जीवनलहरी

हें विशाल अवनीतल
नंदनवन फुललेलें
हांसति रमणीय किती
मनमोहक सान फुलें

अंध परी मनुज खुळे
दिसति न त्या सौख्यफुलें

निर्मुनिया दुःख स्वतः
धरिति करीं पाचोळा !

मंदमंद वाहतसे
ही प्रशान्त मंदाकिनी
जलपृष्ठावर देती
सोडुनिया दीप कुणी

माते, तव गे वत्सल
स्मृतिदीपक अति उज्वल

मम जीवन सरितेवर
बघ तरंगती अजुनी !

अगणित गगनाङ्गणीं या
लुकलुकती किति तारे
निखळति उल्का अनन्त
नभवैभव परि न सरें

एक एक ध्येयें मम
लोपलिं झणिं उल्केसम

या हताश अन्तरांत
दाटला घनान्धकार !

— सौ. शालिनी सोमण

★

★ माझिया अन्तरीं –

पर्णांची सळ्सळ,
नदीची ओढाळ
खळ्खळ अव्खळ,
आंठव चंचळ........

घुमत घुमत
रमत धावत
तुझ्याच स्मृतीत–
–जीवाची ओंजळ !

अबला ? प्रबला–
नभाची चंचला !
–जाहली तुजला
प्रेमळ शीतळ !

मोहरली माया
गुंफियली काया
कोठें ती किमया
सखये, स्नेहाळ !

तरळती भाव
तरल प्रभाव
तयाचा अभाव
जाणवे प्रबळ !

कासाराभीतरीं,
दरियाकंदरीं,
–माझिया अंतरी–
घुमे तव शीळ !

— विठ्ठल

*

## ★ एकदां वाटतें —

एकदां वाटतें
तुझिया साङ्गाती
रमावे अनन्तीं
विहंगमासम !

परन्तु सङ्गति
सम्पल्यानंतर
भणाणें अन्तर
अन्तरालासम !

सुखाचा सखये,
व्हावया शेवट
प्रीत-आटाआट
सम्पता सहसा

किनारा सागरा
क्षितिज नभाला
शेवट विश्वाला
शेवटीं असावा !

तरीहि वाटतें
तुझिया साङ्गाती
रमावे अनन्तीं
विहङ्गमासम !

— विठ्ठल

## ★ करावया अवमान

पंका माजीं कमल उमलतें
ह्मणुन पदीं कां कोण तुडवतें ?
भगवंताच्यॅा करीं शोभतें
लक्ष्मीचें तें स्थान

रजत रसाची धार होऊनी
कभिन्न काळ्या मेघांतूनी
चमकत राही चपलाराणी
कशी ह्मणावी सान

कृष्ण-शिलेच्या पोटीं सुंदर
सोज्वल बालक येई निर्झर
कौतुक त्याचें करितें स्थिरचर
होउनिया बेभान

काळ्या खाणिंत, कोहिनूर तो
जन्म पावतो, भाग्य काढितो
त्यास कधीं कां तुच्छ लेखितो
गातो गौरव गान

जात कोणती सान थोर ती
कोण्या उदरीं निपजें मोती ?
खाण तशी कां माती ह्मणती
करावया अवमान

— वा. शा. करगुप्पीकर

## ★ कूटप्रश्न

हंसलें, तरी तयाला स्मित गोड मानिती ते ।
ह्मणतात ‘ लाजली, ’ जरि चुकवावयास जाते ।
करण्या निषेध, रागें जर स्पष्ट बोललें मी ।
सखये, तरीहि वदती ‘ लटकाच राग नामी ’ ।
छे बाइ ! सोय नुरली या गैरसमजुतीला ।
थांबेल गे, कसा हा अप्रीय प्रेमचाळा ॥

— रा. के. नाडगौडा

## ★ माळीदादा

माळिदादा, हां ! जपुन चालवावें–
शस्त्र अपुलें पाहून जरा घ्यावें ।
जाइ, शेवंती, जुई, निशीगन्ध ।
असे किंवा कर्णीर जासवंद ॥

— रा. के. नाडगौडा

## ★ ज्योतिष्टोम

पेटवील्या या मशाली कोणि कैशा सांग रे ।
शून्य या निःशब्द रानीं मध्यरात्रीं कां बरें ?

कोठें दिसेना कीं इथें, देऊळ किंवा राउळ ।
कोठचें ऐशा ठिकाणीं, लग्न किंवा गोंधळ ।

पाहूं पुढें चल आणखी. रे ! हीं तरी दिसतीं मुलें !
तेजाळ त्यांचीं बालवदनें दीप्त ज्योतींच्या मुळें ॥

उल्हास त्यांच्या अंतरींचा, ओतला अरुणाननीं ।
केवढें आश्चर्य ! त्यांना भीति गेली सोडुनी ॥

डोळ्यांतलें चांचल्य त्यांच्या काय झालें ना कळे
स्थैर्य–निश्चय–बिंबिता दृष्टी तयांची संचळे ॥

पाहिलेंस ! कुमार सुकुमाराग्रकर कमलासम ।
अर्पिती ज्योतींस भावें तोष त्यांना अनुपम ॥

— रा. के. नाडगौडा

## ★ पूजारी —

मी तुझ्या प्रीतिचा पूजारी
मम प्रेमळ पूजा स्वीकारी

गन्ध अक्षता कोठुन आणूं ?
मनीं उणें तव नकोस आणूं
मम हृदयकमल हें फुलें अणु
घे सत्वरि तोडुनि ठेव शिरीं

धूप दीप कासया हवे तुज ?
ठाउक सकलहि असे तुझे मज
ही ज्योत जिवाची ओवाळिन तुज
तव स्निग्ध प्रीतिची धार धरी

नैवेद्य शिजविला प्रेमरसाचा
वदावयाला उरलि न वाचा
दरवळला हा गन्ध प्रीतिचा
तव रसाळ ओष्ठीं कवल करी

कां पूजा म्या तुझी करावी ?
तुझीच वसती उरीं वसावी
पूजा कोणी कुणा करावी ?
तूंच पूज्य अन् पूजारी

— मुरलीधर घाटे

★ <u>मुलांची प्रार्थना</u> —

देवा माझी आई अमर असूंदे
मजशी हंसूं दे सदाकाळ

माझी देवराया तिज बहु माया
सांग पापा घ्याया माझा गोड

देवा माझे बाबा बाहेरी बसती
मज बोलविती रागावून

देवा नारायणा माझे तूं ऐकना
माझ्या तूं बाबांना शांत कर

देवा माझी ताई मज गीत गाई
अंगाई मंगाई गोड गोड

तिच्या तूं गळ्याला गोड दे आवाज
मज येई नीज फार छान

माझा दादा देवा गालाचा तो चावा
घेतो हवा तेव्हां म्हणे पापा

माझा पापा गोड कशाला त्वां केला ?
सांग तो दादाला कडू झाला

माझा मामा आणि चान्दा मामा वर
त्याची येरझार कधीं मधीं

माझा मामा देवा हवा तेव्हां यावा
मज त्यानें न्यावा आजोकडे

— मुरलीधर घाटे

## ★ देव —

फोडोनी दगड माण्डियला देव
त्यास ह्मणें जेव तीन्ही काळ
नागड्या दगडा वस्त्र नेसवीलें
कपाळीं मार्खीलें शुभ्र गन्ध
दगड धुवोनी घटघटा तीर्थ
पितो त्याचा स्वार्थ न सुटेची
दगडाच्या हातीं दिलें एक चक्र
गदा पद्म शङ्ख आयुधें हीं
त्याच आयुधानें प्राण्यासी वधणें
दगड तो जाणे पाप पुण्य !

## ★ अभङ्ग —

सुगन्धास काय लागते सांगावे
चहूं दिशीं जावे हिण्डावया
आपुल्या इच्छेनें जन्मासी तो येतो
सुगन्धे भरी तो सर्व जग
कोणी वानो किंवा कोणी निंदो त्यास
अनासक्त वास करी सर्व
आपुलालें कार्य करूनी निराळा
होई अन्तराळा विलीन तो

— मुरलीधर घाटे

## ★ सिद्धगडावर —

दिनकर अस्ता गेला सरलें दिवसाचें राज्य
निजले पक्षी निजलीं शेतें जगता ये नींज

वसुंधरेला रजनीनें नव श्यामल वसन दिलें
वसन नव्हें भूवरीं क्षपेनें जाळें अंथरिलें

भयाण ऐशा रात्रीं येता हिमकर पूर्वेला
मेघावृत आकाशीं त्याचा प्रभाव नच पडला

त्या काळोख्या रात्रीं होते सात वीर निजले
पठारावरीं सह्याद्रीच्या शांतपणें पडले

तृषा शमविण्या वनांत हिण्डे सिंहाचा छावा
मदांधांक्ष हत्तींला बघुनी त्वेष तया यावा

गंडस्थळ फोडुनी तयाच्या प्राशुनिया रुधिरा
शांत होउनी निघे जावया शोधत गिरिकुहरा

रक्ताङ्कित पावलें तयाचीं वनभागीं उठलीं
वनप्रदेशीं लाल जाहलीं मोत्यें विस्फुटलीं

श्रमला आला बाल केसरी विश्रांती घ्याया
तसेच येती सिद्धगडावरि भाई त्या समया

भयाण होते जङ्गल भंवतीं वृक्ष तिथें दाट
सूर्यालाहि प्रवेश करण्या नसे जेथ वाट

रातकिड्यांची किरकिर आणिक घूं घूं घुबडांचे
साथ तयाला करीत होते रडणें भाळूंचें

विळखा घालुनि शाखांना ते बसले सर्प किती
फूत्कारांनीं त्यांच्या होती विषमय वृक्षतती

काय तयांना माहित ऐशा कातरवेळेला
कुणी नराधम करी तयारी त्यांना धरण्याला

परदास्यांतुनि मायभूमीला मुक्त करायाला
सिद्ध जाहले ज्यांनी धरिले हातीं शिरकमला

चालें कारस्थान तयांचा करावया घात
काय कल्पना त्यांना होते अगदीं निर्धास्त

दीनदुर्बळा हिंदी जनता वाली नच तिजला
स्वातंत्र्याचा किरण भाइजी तुह्मी दाखविला

कर्जतमध्यें नांव न उरलें गोऱ्या बाळांचें
सरले अत्याचार जाहलें स्वराज्य जनतेचें

कृतज्ञतेनें विनम्र व्हावें धन्यवाद द्यावे
प्रात:स्मरणीं पवित्र तुमचें नांव अह्मी घ्यावें

संवय जाहली गुलामगिरीची वाटे ना खंत
ठांवठिकाणा द्याया तुमचा होई उद्युक्त

नराधमा त्या घेउनी निघे पोलिस अधिकारी
सशस्त्र होती फौज बरोबर सारे भाडोत्री

पुढें जाहला तोच नराधम मागोवा घेत
सिद्धगडावर आला जेथें भाईजी सुप्त

चाहुल लागुनि उठले भाई बंदुक सावरली
उठले साथी सुटली गोळी लक्ष्यपार झाली

पडला खालीं तोच नराधम फोडी किंकाळी
स्वजनद्रोही अवलादीला मृत्यू घे जवळी !

खाड खाड आवाज बुटांचें झाडीतुनि आले
अन् गोळ्यांनी पठार सारें दणाणुनी गेले

फैरी झडल्या परस्परांवर पाउस गोळ्यांचा
हन्त ! लागली गोळी पडला देह भाइजींचा

गेले भाई ! स्वतंत्र झाला आत्मा भाईंचा
दास्यबंध नच अजुनी गळला भारतमाईचा

गोरी बाळें साम्राज्याला राखाया नीट
वाहविती हिंदी तरुणांच्या रक्ताचे पाट

उष्ण रक्त तें घेतल्याविना जुलुमांचा बदला
थण्ड न होईल ! कटुकर्मांचा फांस कुणा सुटला !

कोतवाल कुल धन्य जाहले होत अमर भाई
देशासाठीं देह ठेविती मरण तयां नाहीं

पाहिन कधि मी मुक्त मायभू आकांक्षा सुप्त
हुत आत्म्यांची आस राहिली कराल ना तृप्त ?

— गो. म. वाटवे

## ★ स्वागत–गान

[ अभंग ]

तुझ्या गायकाचें प्रभो ! जोखमीचें
काम पडे साचें माझ्याकडे !

वसंतागमनीं उद्यानीं अन् रानीं
फुलतीं तीं गानीं फुलें गुंफी

वर्णी मम गानीं रात्रीची मोहिनी
उषा-संजीवनी मोदकारी

वारुनी जे त्रास आणिती उल्हास
उन्हाळी पाऊस प्रारंभींचे

शरदृतू नामी सुगीच्या हंगामीं
पिकें डोलतीं; मी सर्व वर्णी

मारुत संगतीं सळसळताती
पानें शोभतीं तीं काव्यीं रचीं

तुझ्या कलाकृती किती दिसताती !
दृश्यें गाई मी तीं काव्यबंधीं

मन्मनोमंदिरीं येण्या तूं श्रीहरी !
हृदयाच्या द्वारीं जेव्हां येसी

तेव्हां माझें गान विभो ! थांबो दें न
त्वत्स्वागत–गान उफाळुंदे

( रवीन्द्रांच्या कवितेवरून )

— कृ. बा. कुलकर्णी, कलोळकर

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | वागीश्वरी | ... | ... | १ |
| २ | अरुणाचें तेज | ... | ... | ३ |
| ३ | राहूं कशी दूर ? | ... | ... | ४ |
| ४ | अंवसेची रात्र | ... | .. | ५ |
| ५ | पालवेल तुझी माया | ... | ... | ६ |
| ६ | हृदयांत माझिया | ... | ... | ७ |
| ७ | तिमिरांत वृथा कां जासि असा ? | ... | ... | ८ |
| ८ | परि दूर | ... | ... | ९ |
| ९ | ओहोटीनंतरची भरती | ... | ... | १० |
| १० | आहेर | ... | ... | १३ |
| ११ | रेडिओवर अवतार ! | ... | ... | १४ |
| १२ | चांद | ... | ... | १६ |
| १३ | पांखरांस | ... | ... | १७ |
| १४ | खेड्यांतील जीवन | ... | ... | १८ |
| १५ | चल पुढें ! | ... | ... | १९ |
| १६ | सारंगीचे सूर | ... | ... | २० |
| १७ | मूक प्रेम | ... | ... | २२ |
| १८ | जरी होतास जायचा | ... | ... | २३ |
| १९ | निर्माल्य | ... | ... | २४ |
| २० | जीवनसंगीत | ... | ... | २६ |
| २१ | छायाप्रकाश | ... | ... | २७ |

२२ गंगालहरी ... ... २८
२३ स्वप्नतरङ्ग ... ... २९
२४ ओसण्डते ज्ञानी ! ... ... ३३
२५ क्षण एक ! ... ... ३४
२६ पुष्ट तुझ्या बाहूवरि ! ... ... ३५
२७ क्षितिजाच्या पलीकडे ... ... ३७
२८ जप ... ... ३८
२९ व्हावया पाहतो अनन्तीं लीन ... ... ४१
३० धडपडते जननास्तव ... ... ४४
३१ कणिका ... ... ४६
३२ न कळे तरि का ... ... ४७
३३ घाटांतून ... ... ४९
३४ संभवते तरि कां ... ... ५०
३५ स्वप्नामागें ... ... ५२
३६ परि आज ... ... ५४
३७ हिन्दोळ्यावरची आस ... ... ५५
३८ कुणापुढें दावूं भाग्य माझे ... ... ५७
३९ मधु आशा हृदयीं ... ... ५८
४० जीवनलहरी ... ... ५९
४१ माझिया अन्तरीं ... ... ६१
४२ एकदा वाटतें ... ... ६३
४३ करावया अवमान ... ... ६४
४४ कूट प्रश्न ... ... ६५

| | | |
|---|---|---|
| ४५ | माळिदादा ... ... | ६५ |
| ४६ | ज्योतिष्टोम ... ... | ६६ |
| ४७ | पूजारी ... ... | ६७ |
| ४८ | मुलांची प्रार्थना ... ... | ६८ |
| ४९ | देव ... ... | ६९ |
| ५० | अमङ्ग ... ... | ६९ |
| ५१ | सिद्धगडावर ... ... | ७० |
| ५२ | स्वागत गान ... ... | ७३ |


---

# वाङ्मय प्रकाश मंडळ

—: बेळगांव :—

आगामी प्रकाशन

लघुकथा-संग्रह

? ? ?